2018-19 ISSN 2018-19

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.261

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

July-August-September-2018

Vol. 5 Issue 3

Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)
Dr. Munaf Shaikh, Jalgaon (Urdu)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF)-6.261(2017), (CIF)-3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
UGC Approved Journal | July-August-Sept. 2018 | Vol. 5, Issue 3


| | | | |
|---|---|---|---|
| | **हिंदी विभाग** | | |
| 28 | बौद्ध एवं शैवो की दार्शनिक समन्वयाभिव्यक्ती : नाथ साहित्य | डॉ. शशिकांत सोनवणे | 152 |
| 29 | आचार्य नरेन्द्र का किसान एवं मजदूर आंदोलनो में योगदान | डॉ.राजीव रतन | 163 |
| 30 | नाटककार जगदीशचंद्र माथुर ('कोणार्क नाटक के विशेष संदर्भ में) | डॉ. सुचिता गायकवाड | 169 |
| 31 | हिंदी कविता और वर्तमान संदर्भ में रस सिद्धांत | डॉ.ज्ञानेश्वर महाजन | 176 |
| 32 | आदिवासी क्षेत्रो में महिलाओं की स्थिती | प्रा.आर.एन.वाकळे | 180 |
| 33 | विद्यानिवास मिश्र कें निबंधो में पर्यावरण | डॉ. अनंत शिंगाडे | 183 |
| 34 | डॉ. सुशीला टाकभौरे के काव्य में अभिव्यक्त भारतीय समाज | डॉ. उद्धव भंडारे | 186 |
| 35 | 'मोहें रंग दो लाल' में विषयों की विविधता | प्रा. अंजीता वेलीप | 194 |
| 36 | केदारनाथ अग्रवाल की कहानी 'समाज की भूल में नारी जीवन | प्रा. संतोष नागरे | 201 |
| 37 | संकिर्ण मानसिकता की प्रस्तुति : ' हे गंगा तुम बहती हो क्युं...?' | डॉ. धीरज व्हत्ते | 204 |
| 38 | हिंदी दलित कहानियों में अभिव्यक्त भारतीय समाज | डॉ. उद्धव भंडारे | 208 |
| | **मराठी विभाग** | | |
| 39 | जैन धर्मातील दीक्षा | प्रा. बाळासाहेब गणपाटील | 214 |
| 40 | हिंदू धर्मातील स्त्रियांचे सामाजिक स्थान व मानवी हक्क | डॉ. वंदना चौधरी | 218 |
| 41 | लोकसाहित्यातील लोकजीवन व लोकसमजुती | डॉ. बाबासाहेब शेंडगे | 220 |
| 42 | लोकनाट्य जांभूळ आख्यान | आश्विनी माने | 224 |
| 43 | कोकणातील लोकनाट्य 'नमन-खेळे'-एक चिकित्सा | दुर्गेश मजिक | 230 |
| 44 | साक्री तालुक्यातील अहिराणी ओवीगीतातील स्त्री-जीवन | डॉ.प्रकाश साळुंके | 237 |
| 45 | 'कणसरी इुलं' मधील आदिवासींचे समाज वास्तव | डॉ. अंजली मस्करेन्हस | 243 |
| 46 | चक्रधर स्वामींची साधकासाठी आचारसंहिता | डॉ. प्रवीण कारंजकर | 247 |
| 47 | संत चोखामेळा आणि त्यांचा परिवार | डॉ.काशिनाथ ब-हाटे | 250 |
| 48 | संत कवयित्रींच्या काव्यातील मुक्त आविष्कार | डॉ. शीला गाढे | 257 |
| 49 | विद्याधर गोखले यांची संगीत नाटके | प्रा. विद्या वावणे | 260 |
| 50 | १९६० पूर्वीच्या मराठी नाटकातील स्त्री | डॉ. अशोक लिंबेकर | 263 |
| 51 | महापुरुषांच्या कृतीशील जलनीतीची वर्तमानकालीन उपयुक्तता | डॉ. दादाराव गुंडरे | 271 |
| 52 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि अस्पृश्यता निर्मुलन | डॉ.उमाकांत वानखेडे | 275 |
| 53 | राजर्षी शाहू महाराज यांचे अस्पृश्यांच्या उद्धाराचे कार्य | डॉ. लता आंदे | 279 |
| 54 | महात्मा गांधींच्या विचारांचा मराठी साहित्यावरील प्रभाव | डॉ. अनिल गर्जे | 285 |
| 55 | दलित कविता आणि सद्यस्थिती : एक आढावा | प्रा.सिद्धार्थ इंगोले | 289 |
| 56 | दलित कविता आणि सद्यस्थिती | डॉ. बाळासाहेब लिहीणार | 292 |
| 57 | अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील गावगाडा | डॉ. सहदेव चव्हाण | 295 |
| 58 | ग्रामीण कादंबरीतील स्त्री संघर्ष | डॉ. संतोष देशमुख | 299 |
| 59 | मराठी साहित्यातील स्त्रियांचे कथालेखन | डॉ.सुवर्णा गाडगे | 302 |
| 60 | राष्ट्रसंतांच्या लेखनातील राष्ट्रीय विचार | डॉ. प्रवीण कारंजकर | 307 |
| 61 | 'पोटमारा' कादंबरीतून उच्च शिक्षित तरुणांच्या समस्या | डॉ.किशोर पाठक | 311 |

| | | | |
|---|---|---|---|
| | **हिंदी विभाग** | | |
| 28 | बौद्ध एवं शैवो की दार्शनिक समन्वयाभिव्यक्ती : नाथ साहित्य | डॉ. शशिकांत सोनवणे | 152 |
| 29 | आचार्य नरेन्द्र का किसान एवं मजदूर आंदोलनो में योगदान | डॉ.राजीव रतन | 163 |
| 30 | नाटककार जगदीशचंद्र माथुर ('कोणार्क नाटक के विशेष संदर्भ में) | डॉ. सुचिता गायकवाड | 169 |
| 31 | हिंदी कविता और वर्तमान संदर्भ में रस सिद्धांत | डॉ.ज्ञानेश्वर महाजन | 176 |
| 32 | आदिवासी क्षेत्रो में महिलाओं की स्थिती | प्रा.आर.एन.वाकळे | 180 |
| 33 | विद्यानिवास मिश्र के निबंधो में पर्यावरण | डॉ. अनंत शिंगाडे | 183 |
| 34 | डॉ. सुशीला टाकभौरे के काव्य में अभिव्यक्त भारतीय समाज | डॉ. उद्धव भंडारे | 186 |
| 35 | 'मोहें रंग दो लाल' में विषयों की विविधता | प्रा. अंजीता वेलीप | 194 |
| 36 | केदारनाथ अग्रवाल की कहानी 'समाज की भूल में नारी जीवन | प्रा. संतोष नागरे | 201 |
| 37 | संकिर्ण मानसिकता की प्रस्तुति : ' हे गंगा तुम बहती हो क्युं...?' | डॉ. धीरज व्हत्ते | 204 |
| 38 | हिंदी दलित कहानियों में अभिव्यक्त भारतीय समाज | डॉ. उद्धव भंडारे | 208 |
| | **मराठी विभाग** | | |
| 39 | जैन धर्मातील दीक्षा | प्रा. बाळासाहेब गणपाटील | 214 |
| 40 | हिंदू धर्मातील स्त्रियांचे सामाजिक स्थान व मानवी हक्क | डॉ. वंदना चौधरी | 218 |
| 41 | लोकसाहित्यातील लोकजीवन व लोकसमजुती | डॉ. बाबासाहेब शेंडगे | 220 |
| 42 | लोकनाट्य जांभूळ आख्यान | आश्विनी माने | 224 |
| 43 | कोकणातील लोकनाट्य 'नमन-खेळे'-एक चिकित्सा | दुर्गेश मजिक | 230 |
| 44 | साक्री तालुक्यातील अहिराणी ओवीगीतातील स्त्री-जीवन | डॉ.प्रकाश साळुंके | 237 |
| 45 | 'कणसरी दुलं' मधील आदिवासींचे समाज वास्तव | डॉ. अंजली मस्करेन्हस | 243 |
| 46 | चक्रधर स्वामींची साधकासाठी आचारसंहिता | डॉ. प्रवीण कारंजकर | 247 |
| 47 | संत चोखामेळा आणि त्यांचा परिवार | डॉ.काशिनाथ बऱ्हाटे | 250 |
| 48 | संत कवयित्रींच्या काव्यातील मुक्त आविष्कार | डॉ. शीला गाडे | 257 |
| 49 | विद्याधर गोखले यांची संगीत नाटके | प्रा. विद्या बावणे | 260 |
| 50 | १९६० पूर्वीच्या मराठी नाटकातील स्त्री | डॉ. अशोक लिंबेकर | 263 |
| 51 | महापुरुषांच्या कृतीशील जलनीतीची वर्तमानकालीन उपयुक्तता | डॉ. दादाराव गुंडरे | 271 |
| 52 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि अस्पृश्यता निर्मुलन | डॉ.उमाकांत वानखेडे | 275 |
| 53 | राजर्षी शाहू महाराज यांचे अस्पृश्यांच्या उद्धाराचे कार्य | डॉ. लता आंदे | 279 |
| 54 | महात्मा गांधींच्या विचारांचा मराठी साहित्यावरील प्रभाव | डॉ. अनिल गर्जे | 285 |
| 55 | दलित कविता आणि सद्यस्थिती : एक आढावा | प्रा.सिद्धार्थ इंगोले | 289 |
| 56 | दलित कविता आणि सद्यस्थिती | डॉ. बाळासाहेब लिहीणार | 292 |
| 57 | अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील गावगाडा | डॉ. सहदेव चव्हाण | 295 |
| 58 | ग्रामीण कादंबरीतील स्त्री संघर्ष | डॉ. संतोष देशमुख | 299 |
| 59 | मराठी साहित्यातील स्त्रियांचे कथालेखन | डॉ.सुवर्णा गाडगे | 302 |
| 60 | राष्ट्रसंतांच्या लेखनातील राष्ट्रीय विचार | डॉ. प्रवीण कारंजकर | 307 |
| 61 | 'पोटमारा' कादंबरीतून उच्च शिक्षित तरुणांच्या समस्या | डॉ.किशोर पाठक | 311 |

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF)-6.261(2017), (CIF) -3.452(2015), (GIF) -0.676 (2013)
UGC Approved Journal July-August-Sept. 2018 Vol. 5, Issue 3

# राजर्षी शाहू महाराज यांचे अस्पृश्यांच्या उध्दाराचे कार्य

डॉ. लता दिगंबर आंदे
शंकरराव जगताप आर्टस् अॅण्ड कॉमर्स् कॉलेज, वाघोली.
ता. कोरेगाव, जि.सातारा.
मो. ९४२०८०८९६१

कागलचे घाटगे हे आदिलशाही दरबारातील एक नामांकित सरदार घराणे होते. या घराण्यातील भानजी या पराक्रमी पुरूषाने आदिलशहाकडून 'सर्जेराव' हा किताब प्राप्त केला. शिवाजीचा मुलगा राजाराम महाराज यांची पत्नी राजसबाई याच घराण्यातील होती. कोल्हापूरकर दुसरे शिवाजी यांनी आपली कन्या जिऊबाई हिचा विवाह यशवंतराव घाटगे यांच्याशी घडवून आणला. नारायणराव घाटगे यांचा विवाह बाबासाहेब छत्रपती यांची बहिण बाळाबाईशी झाला. यांचा मुलगा जयसिंगराव उर्फ आबासाहेब घाटगे यांचा जन्म १८५६ मध्ये झाला. छत्रपतीचा भाचा या नात्याने आबासाहेबांचे बालपण कोल्हापूरच्या राजवाडयात गेले. आठव्या वर्शी त्यांचा विवाह मुधोळच्या राजकन्या राधाबाई यांच्याशी झाला. वयाच्या १२व्या वर्षी या घाटगे घराण्याचे अधिपती झाले. एक आदर्श व कार्यक्षम शासक म्हणून त्यांनी कोल्हापूर राज्याच्या जहागिरदारांमध्ये लौकिक प्राप्त केला. आबासाहेब.– राधाबाई या दांपत्यास कोल्हापूर मुक्कामी २६ जून १८७४ रोजी पुत्रप्राप्ती झाली. या मुलाचे नाव 'यशवंतराव' ठेवले. यशवंतराव म्हणजेच शाहू महाराज होत.[१] ब्रिटिश आणि राजाराम महाराज यांचे बिनसल्यामुळे व त्यांना मनोरूग्न ठरवून ब्रिटिश अधिका–यांच्या हवाली केले. याच काळात ब्रिटिश सरकारने आबासाहेब घाटगे यांना कोल्हापूर राज्याचे रीजंट म्हणून नियुक्त केले. लवकरच चौथे शिवाजी महाराजांचा अहमदनगर मुक्कामी मृत्यू झाला. [२] (२५ डिसेंबर १८८३) .

रिकाम्या झालेल्या छत्रपतीच्या गादीवर जवळचे वारसदार म्हणून रीजंट आबासाहेब यांच्या ज्येष्ठ पुत्राची म्हणजे यशवंतरावाची निवड ब्रिटिशांच्या संमतीने केली गेली. चौथ्या शिवाजी महाराजांची राणी आनंदीबाई यांनी १७ मार्च १८८४ रोजी यशवंतरावांना विधिवत दत्तक घेतले. [३]

कागलच्या घाटगे घराण्यातील यशवंतराव 'शाहू छत्रपती' म्हणून कोल्हापूरच्या गादीवर आरूढ झाले. त्यांनी अस्पृश्योउध्दाराचे कार्य हाती घेतले ते कार्य आयुश्यभर करीत राहिले.

**शाहू महाराज यांनी अस्पृश्योध्दाराचे कार्य केले ते पुढीलप्रमाणे:**

अस्पृश्योध्दाराचे कार्य हाती घेतल्यानंतर, शाहू महाराजांनी आपल्या पत्रव्यवहारांतून व सभा–परिषदांतून, अस्पृश्य समाजविषयीचे आपले विचार व्यक्त केले होते.

**अस्पृश्यांची अस्मिता व आत्मविश्वास :**

शशेकडो वर्ष अस्पृश्य समाजावर जुलमी ब्राम्हणशाहीने प्रस्थापित केलेल्या जबरदस्त वर्चस्वाने त्या समाजातील अस्मिता, स्वाभिमान, आत्मविश्वास आदि गुण नाहीसे झाल्याचे महाराजांचे मत होते. या गुणांची निर्मिती अस्पृश्यांच्या ठायी व्हावी, या दृष्टीने महाराजांचे सुधारणांचे प्रयत्न चालू होते. त्यापैकी एक म्हणजे अस्पृश्य लोकांना दिलेल्या वकिली व्यवसायाच्या सनदा. अशा सनदांचा ब्राम्हण वर्गाने मोठा गवगवा केला होता. खुद्द ब्राम्हणादी वरिष्ठ वर्गास जेव्हा अशा प्रकारच्या सनदा दिल्या होत्या, तेव्हा मात्र काही त्यांची टीकाटिपणी झाली नव्हती. '' नागपूरच्या परिषदेतील भाषणात महाराज म्हणतात,'' मॅट्रिक पास झालेले अगर इंग्रजी चागले शिकलेले महार , मांग वरिष्ठ दर्जाच्या धद्यात आणताच ब्राम्हणी समाज खवळून गेला. तेच महार,मांग जर ख्रिश्चन

झाले असते तर माझे कृत्य टीकेस पात्र झाले नसते. ज्या महार –मांगास मी वकिलीच्या सनदा दिल्या त्यांच्यापेक्षा विद्येने व अकलेने फार कमी अशा पुष्कळ वरिष्ठ जातीच्या लोकास कित्येक देशी संस्थानातून वकिलीच्या सनदा देण्यात येतात, त्याबद्दल मात्र समाजास काही कमीपणा वाटत नाही.... अशा वकिलीच्या सनदा देण्यात माझा हेतू एवढाच आहे की, जे धंदे अस्पृश्य वर्गास रूढीने , कायद्याने अगर दडपशाहीने बंद झालेले आहेत, ते त्यास मोकळे करून द्यावेत व त्यांची स्थिती सुधारून त्यांच्यात आपण इतर माणसांचे बरोबरीचे आहोत, असा आत्मविश्वास उत्पन्न करावा''. असा आत्मविश्वास निर्माण करण्याची संधी, त्यांनी सभा–परिषदांमध्ये केलेल्या अनेक भाषणांतून घेतलेली दिसते. १९२० च्या परिषदेत शाहू महाराज म्हणतात, ''अस्पृश्य हा षब्द कोणत्या माणसास लावणे फार निंद्य आहे. तुम्ही अस्पृश्य नाही. तुम्हास अस्पृश्य मानणा–या पुष्कळ लोकांपेक्षा जास्त बुध्दिमान, पराक्रमी, स्वार्थत्यागी, असे तुम्ही राष्ट्राचे आहात. मी तुम्हाला अस्पृश्य समजत नाही. आपण निदान बरोबरीची भावंडे आहोत. अशी भावना धरून आपणास पुढील कामास लागले पाहिजे''. [४]

**पुढारी आपल्या जातीचाच असावा.**

अस्पृश्य समाजाने आपल्या मुक्तीसाठी व उन्नतीसाठी वरिष्ठ वर्गातील पुढारी घेऊ नयेत त्यासाठी आपल्या जातीचाच पुढारी करावा, असे मत शाहूनी अनेक ठिकाणी मांडले आहे. अस्पृश्याचे एक नेते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सहकारी सीताराम शिवतरकर यांना लिहिलेल्या पत्रात महाराज म्हणतात,

''जो दुस–यावरी विश्वासला। त्याचा कार्यभाग बुडाला ।
जो आपणच कश्टत गेला । तोचि जाण भला ।। [५]

स्वत: मी अगर बडोद्याचे महाराज किंवा हैद्राबादचे निजाम, चंदावरकर, शिंदे अशा लोकांची मते घावीत पण त्यांना पुढारी समजू नये. पुढारी आपल्या जातीतीलच असावा. पशूदेखील आपल्या जातीतीलच पुढारी स्वीकारतात. म्हणून मनुष्यांनी ही आपल्याच जातीतील पुढारी स्वीकारावा. महाराजांनी अस्पृश्यांच्या उध्दारासाठी अनेक गोष्टी केल्या होत्या पण पुढारीपण स्वीकारले नाही. अस्पृश्यांचे पुढारीपण त्यांच्याच नेत्याने करावयास हवे, माणगाव परिषदेत डॉ. आंबेडकरांच्या रूपाने अस्पृश्यांनी आपला 'खरा पुढारी' शोधून काढला. त्याबद्दल शाहू महाराजांनी त्यांचे अभिनंदन केले होते.

**हे माझे पवित्र जीवण कार्य :**

शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात, बहुजन समाजाचा हवा तेवढा उध्दार करावा त्यासाठी ब्रिटिश सरकारची काही आडकाठी नव्हती, पण त्यांनी संस्थानाबाहेरच्या मुलखातील सामाजिक चळवळीत भाग घेऊ नये अथवा चळवळींना प्रोत्साहन देऊ नये. असे इंग्रज सरकारला वाटत होते. महारज हे मांडलिक संस्थानिक असल्यामुळे संस्थानाबाहेरच्या सभा संमेलनात भाग घेण्यासाठी मुंबई सरकारची परवानगी घ्यावी लागे. ब्रिटिश सरकार काही प्रसंगी आपली नापसंती व्यक्त करीत असे. ही नापसंती म्हणजे आडवळणाने एक प्रकारची दमदाटीच असे.

अशाच एका दमदाटीच्या खलित्यास उत्तर देतांना महाराज म्हणतात, '' महाराष्ट्रातील अस्पृश्यांसकट सर्व मागासलेल्या बहुजन समाजाचा उध्दार,हे माझे पवित्र जीवण कार्य आहे. या लक्षावधी शेतकरी, कामकरी नि मजुर बांधवाची सामाजिक, धार्मिक व आर्थिक सुधारणा झाल्याशिवाय सरकारने राजकारणी हक्काची भाषा बोलावी तरी कशाला? हक्क देणार कुणाला? घेणार कोण? सरकार मला पदच्युतीच्या बुरखेबाज धमक्या देत आहे. तुम्ही पदच्युत करण्यापूर्वी मीच आत्मसंतोषाने गादीचा राजीनाम देईन: पण एकदा हातात घेतलेली ब्राम्हणेत्तराची चळवळ, प्राण जाईतोवर हा शाहू सोडणार नाही! [६]

शाहू महाराजांनी आपल्या संस्थानाच्या सरकारी व खाजगी खात्यात अस्पृश्यांना नोकऱ्या दिल्या. अस्पृश्यांमध्ये आत्मविश्वास व अस्मिता निर्माण केली. उदा. संस्थानात लष्करी सेवेत मराठा व इतर जातीचे लोक असत. ही सर्व मंडळी अस्पृश्यता पाळणारी होती. शाहू महाराजांनी १९१७ साली आपल्या लष्करी फडात चार अस्पृश्यांची नेमणूक केली. त्यात दोन महार व दोन मांग होते.

**तलाठयांच्या नेमणूका — एक सामाजिक क्रांती**

अन्य सरकारी सेवेतही अस्पृश्यांच्या नेमणूका केल्या जाव्यात. यासाठी महाराजांनी ५ ऑगस्ट १९१८ रोजी, खास हुकूम काढला होता, " अस्पृश्य जातीच्या लोकांना तलाठी नेमण्याबद्दल अलाहिदा हुकूम देण्यात आलेला होता. जे लोक आपले कर्तबगारीने व बुध्दीने पुढे येतील, त्यास भाग कारकून वा अव्वल कारकून अशा प्रकारच्या जागा देण्यात याव्यात". [७]

महाराजांनी संस्थानातील कुलकर्णी वतन खालसा करून त्या ठिकाणी ब्रिटिश पध्दतीप्रमाणे 'तलाठी' नेमण्याची पध्दत स्वीकारली. या तलाठयांच्या जागांवर अस्पृश्यांची वर्णी लागावी म्हणून 'तलाठी' वर्ग सुरू करून त्यात अस्पृश्य उमेदवारांना शिष्यवृत्त्या देऊन प्रशिक्षित केले गेले. अशा प्रशिक्षित अस्पृश्यांना तलाठी म्हणून नेमले जावे. यासाठी महाराजांनी हुकूम काढला होता.

तलाठयांच्या जागांवर अस्पृश्यांच्या नेमणूका होऊ लागल्या त्यामुळे महार तलाठी शाहूच्या कृपेने गावच्या पाटलांच्या बरोबरीने बसू लागला. मराठा रयतांकडून रामराम स्वीकारू लागला. हे चित्र म्हणजे केवळ सामाजिक बदल नव्हत्या, ती एक सामाजिक क्रांती होती. १९२० साली शहरातील पोलीस गेटवर १६ महारांची नेमणूक केल्याचे महाराजांनी म्हटले आहे. 'या लोकांचा समाजात दर्जा वाढावा' म्हणून आपण हे करीत आहोत.

**समाज धुरंधर राजर्षी :**

शाहू महाराजांनी दलित वर्गाला शैक्षणिक सवलती देण्यासाठी एक वटहुकूम जाहीर केला. आणि त्या हुकूमाव्दारे संस्थानातील सर्व शाळा, हायस्कूल व कॉलेज यामधून दलित विद्यार्थ्यांना सर्रास मोफत शिक्षण देण्याची आज्ञा दिली.[८] त्याबरोबरच या शाळांतून कसलाही भेदाभेद करू नये. असेही फर्माविले. अस्पृश्य समाजासाठी ज्या निरनिराळ्या शाळा होत्या त्याही बंद करण्यात आल्या. तेथील विद्यार्थ्यांना सरकारी शाळेची व्दारे खुली करण्यात आली.

**वटहुकूमाची अंमलबजावणी :**

सार्वजनिक पाणवठे,विहिरी,हौद, तलाव व नळ यावर पाणी भरण्याचाहक्क सर्वांना सारखाच आहे. या ठिकाणी जातीच्या सबबीवर कोणलाच प्रतिबंध करता येणार नाही. अशी महाराजांनी घोषणा केली. [९] त्यामुळे महार तरूणांनी हस्तक्षेप करून कोल्हापूरातच त्याच्या अंमलबजावणीस सुरूवात झाली. अस्पृश्यांना खूप मारहान झाली. कोल्हापूर शहरात महानगरपालिकेच्या उत्तरेस असलेल्या सार्वजनिक नळावर इतराप्रमाणे पाणी भरण्याचा आपलाही हक्क आहे. हे प्रस्थापित करण्यासाठी हातात बादल्या घेऊन काही तरूण त्या नळावर गेले. या नळाला लागुनच एक ख्रिश्चन चर्च असून त्याच्या पूर्व बाजूला एका बेकर नावाच्या ख्रिश्चन मिशन—याचे पुस्तक विक्रीचे दुकाण होते. सर्व दुकाणदार त्या नळाचा उपयोग करीत. परंतु महार लोकांनी या नळावर पाणी भरू नये असा दबाव आणला. या दबावाला न भिता महारमंडळी तेथे पाणी भरण्यास गेले. त्यावेळी सवर्णांनी त्यांना खुप मारहान केली. या जखमी लोकांना बेकर यांनी दुकाणात आश्रय दिला. योगायोग या रस्त्यांनी शाहू महाराजांचा रथ आला. महाराजांनी चौकशी केली. जखमी लोकांना सोनतळी कॅपमध्ये नेले. त्यांच्यावर औषधोपचार केला. यानंतर पोलीस घटनास्थळी आली. त्यांनी काही लोकांना अटक केली. या दंगलीत गंगाराम कांबळे होते. या जखमी लोकांनी दाखविलेल्या धैर्याबद्दल महाराजांनी त्यांचे कौतुक केले.

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF)-6.261(2017), (CIF) -3.452(2015), (GIF) -0.676 (2013)
UGC Approved Journal July-August-Sept. 2018 Vol. 5, Issue 3

**भवानी मंदिर प्रवेश :**

शाहू महाराजांचे कुलदैवत भवानी मातेचे मंदिर दलितवर्गाला दर्शनासाठी खुले करून महाराजानी एक नवा विक्रम प्रस्थापित केला. प्रचलित रूढीला धक्का देणारी ही एक क्रांतिकारक घटना आहे. [१०] रूढीचे तट नेस्तनाभूत करून समतेचे वातावरण निर्माण करण्यासाठी महाराजांनी अनेक गोष्टी केल्या आहेत. भवानी मंदिर प्रवेश ही एक त्यातील ऐतिहासीक घटना आहे.

**महाराघरची भाजी भाकरी :**

रायबागेला शाहू महाराजांचा शिकारी कॅप होता. शिकारीत असतांना महाराजांचा टिफिन बॉक्स घोडयाबरोबर धावत असलेल्या मोतद्दाराजवळच असायचा असा प्रघात होता. हे मोतद्दार बहुतेक महार समाजाचे असायचे. याबद्दल काही लोकांनी महाराजांना खटकले. यावर उत्तर देतांना महाराज म्हणतात, "तो माझ्या विश्वासाचा व निष्ठेचा प्रश्न आहे. माझा मोतद्दारावर संपूर्ण विश्वास आहे. म्हणूनच त्यांच्या हातचे अन्न घेणे मला सोयीस्कर वाटते. पुन्हा याबाबत तक्रार करू नका, अशाप्रकारे शिवाशिवीचा प्रश्न निर्माण करून विरोधकांनी बरेच काहूर उठविले".[११] एकदा शिकार करीत असतांना महाराजांना पाणी पिण्यास गरज भासली पण काहीतरी खाल्ल्याशिवाय पाणी पिऊ नये असा सल्ला डॉक्टरांनी दिला. एक व्यक्ती भाकरीचे गाठोडे घेऊन जात होता. त्याला बोलाविले. गाठोडे सोडले व त्यातील चटणी भाकरी खाल्ली व त्यानंतर पाणी पिले ही भाजी भाकरी एका महाराच्या घरची होती.

**म्युनिसिपालीटीच्या चेअरमनपदी अस्पृश्य :**

कोल्हापूरच्या म्युनिसिपालीटीच्या कार्यालयातही प्रथमच एक अस्पृश्य नेमला गेला. एवढेच नव्हे तर म्युनिसिपालीटीच्या चेअरमनपदी प्रथमच एका अस्पृश्यांची दत्तोबा पोवार यांची महाराजांच्या प्रेरणेने नेमणूक झाली. ही घटना त्या काळी प्रथमच घडली असावी.

१९२० साली म. शिद्यांना लिहिलेल्या पत्रात महाराज म्हणतात," मी कोल्हापूरात असतांना आपण एकदा इकडे येऊन जावे. हल्ली कोल्हापूरात म्युनिसिपालीटीचे चेअरमन हे अस्पृश्य जातीचा असून एक व्हटकर नावाचा कर्लाक २० रू पगारावर अस्पृश्य जातीतील आहे. आजवर ब्राम्हणांकडून अस्पृश्यांना जो त्रास होत असे. तो आता नाहीसा झाला आहे." [१२]

**जाठ,सरदार आणि पंडित पैलवान :**

अस्पृश्य लोकांची आडनावे ब–याचदा जातिवाचक असत.त्यामुळे त्यांना अनेक अडचणी येत होत्या म्हणून महाराजांनी त्यांचे नाव बदलले. कुस्त्यांच्या मैदानात पैलवानांना हाक मारतांना महार पैलवानांना 'जाठ' पैलवान, चांभारांना 'सरदार' व भंग्यांना 'पंडित' अशी नावे ठेवली होती. इतर जातीतील पैलवानाबरोबर खेळतांना त्रास झाला असता म्हणून नावे बदलून खेळायला लावले". [१३]

**महाराजांची अजब युक्ती :**

राजर्शी शाहू महाराज यांचे वास्तव्य सोनतळी कॅपमध्ये होते. कॅपमध्ये पिण्याच्या पाण्याची फारच टंचाई होती. उन्हाळयाचे दिवस होते. कॅपमध्ये एकच हौद होता. सवर्ण हिंदूच त्या हौदावर पाणी भरत होते. अस्पृश्य वर्गाला या ठिकाणी पाणी भरण्यास बंदी होती. पाण्यासाठी व्याकुळ झालेली एक झाडुवाली सर्वांची नजर चुकवून त्या हौदावर गेली व तिने आपली मातीची घागर भरली. ती बाई महार जातीची होती. तिला सवर्णांनी शिवीगाळ केली व त्या बाईला शाहूसमोर उभे केले. कर्मचा–यांनी केलेला हा प्रकार पाहून महाराज एकदम भडकले व त्या बाईला रागाच्या भरात अभद्र शब्द बोलले. बोलता बोलता महाराजांना ठसका लागला आणि घसा कोरडा पडला.

व पाणी आणा , पाणी आणा म्हणून ओरडू लागले. तेव्हा एकाने त्या मातीच्या मडक्यातून पेलाभर पाणी महाराजांच्या हाती दिले. ते त्यांनी घेतले. व ते पाणी पिले.

"ज्या घागरीतील पाण्याबद्दल तुम्ही एवढे वादंग घातले. त्याच महारणीच्या घागरीतील पाणी पाजून मला तुम्ही बाटविले. आणि तुम्ही शुध्द राहिला., याला काय म्हणावे? [१४] महाराजांनी हा मारलेला टोमणा हजर असलेल्या लोकांना लागला. हा युक्तीवाद प्रभावशाली ठरला. जमलेल्या लोकांनी मतपरिवर्तन झाल्याचे दाखविण्यासाठी त्या घागरीतील पाणी प्राशन केले.महाराजांनी दिलेला स्वकर्तृत्वाचा धडा सर्वांनी गिरविला.यापुढे भेदाभेद मानणार नाही अशी प्रतिज्ञा घेतली. समतेचा विजय झाला.

**वेठबिगारावर बंदी :**

शाहू महाराजांनी १३ व १५ १९२० रोजी करवीर गॅझेटमध्ये वेठबिगारी बंद केल्याचा हुकूम प्रसिध्द केला. महार, मांग वगैरे कोणी अस्पृश्य लोकांकडून राजघराण्यातील लोकांशिवाय व संस्थानाच्या दप्तराच्या कामाशिवाय वेठबिगार घ्यावयाचे नाही असे जाहीर केले. जर पाटलाने वेठीस महार धरला तर त्यास वतनातून कमी केले जाईल. मांगाकडून कोणतेही काम फुकट करून घ्यावयाचे नाही. जर अशा स्वरूपाचे काम करून घेईल त्यांना कडक शिक्षा केली जाईल असा आदेश शाहू महाराजांनी काढला.

**मागासवर्गीयांसाठी आरक्षण :**

२६ जुलै १९०२ मध्ये करवीर गॅझेटमध्ये एक अपूर्व व चित्तथरारक जाहीरनामा प्रसिध्द केला.त्यात म्हटले होते की, मागासवर्गीयांची प्रगती करण्याच्या आपल्या धोरणानुसार मागासवर्गीयांनी उच्च शिक्षण घेण्यास उद्युक्त व्हावे म्हणून त्या वर्गाना सरकारी खात्यात पूर्वीपेक्षा अधिक नौक—या द्याव्या असे आपण ठरविले आहे. [१५] तरी या जाहीरनाम्याच्या दिवसापासून सरकारी खात्यात ज्या जागा रिकाम्या होतील त्यातील ५० टक्के जागांत मागासवर्गीयांमधील सुशिक्षित तरूणांची भरती करावी. अशी आपली इच्छा आहे. हा जाहीरनामा म्हणजे मागासवर्गीयांच्या अधिकार ग्रहणाच्या आगमणाची व प्रस्थापित्यांच्या सत्तेला आळा बसण्याची चाहूल होती. प्रथमच प्रशासनात ५० टक्के आरक्षण जाहीर केले होते. हा जाहीरनामा म्हणजे नवीन युगाच्या आगमनाची घोषणा करणारा राजर्षी शाहू महाराज अग्रदूत ठरला आहे.

RESEARCHJOURNEY

**अस्पृश्यांच्या हातच्या अन्नोदकांचा जाहीर स्वीकार :**

तो काळच असा होता की, अस्पृश्यांना शिवणे म्हणजे अपवित्र घटना मानली जात होती. माणगावच्या अस्पृश्य परिषदेत शाहू महाराजांनी भर सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांनी सोनतळी कॅम्पवर येऊन आपल्याबरोबर भोजन घ्यावे, अशी विनंती केली व त्याप्रमाणे कॅम्पवर भोजनाचा व सत्काराचा कार्यक्रम घडवून आणला. या कार्यक्रमाला अनेक सत्यशोधक मंडळी उपस्थित होती. त्या सर्वांवर या घटनेचा प्रभाव पडला. १९२० मध्ये, नागपूरला 'अखिल भारतीय बहिकृत परिषद ' भरली. त्या परिषदेच्या अध्यक्षपदाचा मान महाराजांना दिला गेला.परिषदेच्या भर कार्यक्रमात महाराजांनी, ब्राम्हण, मराठे वगैरे सर्व जातीच्या पुढा—यासमक्ष, मुद्दाम अस्पृश्यांच्या हातचा चहा घेतला', अशी नोंद त्यांच्या चरित्रात मिळते. [१६]

अशारितीने शाहू महाराजांनी समाजातील अस्पृश्यता, जातीभेद, शिवाशिव नष्ट व्हावी यासाठी आयुष्यभर कार्य केल्याचे दिसून येते. यातूनच त्यांचे महानत्व दिसून येते.

**सारांश :**

'अस्पृश्यता' ही मानवाला लागलेला महाभयंकर कलंक होता. या काळात अस्पृश्यांचे जीवन अतिशय लाजीरवाने होते. भवानी मंदिर प्रवेश खुले करण्यात आले. सार्वजनिक पाण्याचे नळ, हौद सर्वांसाठी खुले करण्यात आले. अस्पृश्यांना सरकारी शाळेत शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यात आले. आडनावे बदलण्यात आली.

शिवाशिव, जातीभेद, वतनदारी पध्दत व वेठबिगारी नष्ट करण्यात आली. शासनात वेगवेगळ्या पदावर अस्पृश्यांना घेण्यात आले. वतनदारी पध्दत बंद करून त्या ठिकाणी तलाठयांची रोख पगारावर नियुक्ती करण्यात आली. लोककल्याणकारी राजा, अस्पृश्यांचा उध्दारकर्ता, समाजसुधारक, दलितांचा कैवारी, प्रशासणात मागासवर्गीयासाठी सर्वात प्रथम ५० टक्के आरक्षण करण्यात आले. अस्पृश्यांना प्रशासणात विविध पदावर नेमणूक करणारा अग्रदूत ठरला. असे थोर अष्टपैलू व्यक्तीमत्व असणारे शाहू महाराज होते.

संदर्भ ग्रंथ यादी:

१. राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य :डॉ. जयसिंगराव पवार, अरूधंती प्रकाशन, प्रथम आवृती –२०१४, पृ. १३
२. तत्रैव पृ. १४
३. तत्रैव पृ. १४
४. तत्रैव पृ. ७०
५. तत्रैव पृ. ७१
६. तत्रैव पृ. ७१
७. तत्रैव पृ. ७२
८. राजर्षी शाहू गौरव ग्रंथ : महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग सचिवालय,मुंबई, २३ फेब्रु–१९७६ पृ.५०६
९. तत्रैव पृ. ५०७
१०.तत्रैव पृ. ५१४
११.तत्रैव पृ. ५१५
१२.राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य : पृ. ७३
१३.तत्रैव पृ. ७४
१४.राजर्षी शाहू गौरव ग्रंथ : पृ. ५०८
१५.राजर्षी शाहू छत्रपती : धनजय कीर , पॉप्युलर प्रकाशन , मुंबई, २००५ पृ.१२२
१६.राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य : पृ. ७४

RESEARCH JOURNEY